पाटीदारचा झंझावात कायम

बंगळूरुची मुंबईवर १८ धावांनी मात; कृणालची फिरकी प्रभावी

अन्वय सावंत, लोकसत्ता

मुंबई : ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये एखादी खेळीही सामन्याचे चित्र पालटू शकते, असे म्हटले जाते. याचाच प्रत्यय रविवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आला. कर्णधार रजत पाटीदारच्या (२० चेंडूंत ५३) झंझावाती खेळीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाने 'आयपीएल' क्रिकेटच्या सामन्यात मुंबई इंडियन्सवर १८ धावांनी विजय मिळवला. दोन्ही संघांनी द्विशतकी मजल मारलेल्या या सामन्यात बंगळूरुसाठी डावखुरा फिरकीपटू कृणाल पंड्याची (१/२६) कामगिरीही महत्त्वाची ठरली.

वानखेडेच्या फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्टीवर मुंबईने नाणेफेक जिंकून धावांचा पाठलाग करण्याचा निर्णय घेतला. मात्र, तो त्यांच्या पथ्यावर पडला नाही. बंगळूरुने २० षटकांत ४ बाद २४० अशी धावसंख्या उभारली. याचा पाठलाग करताना मुंबईला ५ बाद २२२ धावाच करता आल्या. त्यामुळे मुंबईला चार सामन्यांत तिसरा पराभव पत्करावा लागला. मुंबईसाठी शेर्फेन रुदरफोर्ड (३१ चेंडूंत नाबाद ७१), कर्णधार हार्दिक पंड्या (२२ चेंडूंत ४०), रायन रिकल्टन (२२ चेंडूंत ३७) आणि सूर्यकुमार यादव (२२ चेंडूंत ३३) यांनी प्रयत्न केले. मात्र, त्याआधी गोलंदाजांना आलेल्या अपयशाचा मुंबईला फटका बसला.

बंगळूरुसाठी यंदाच्या हंगामात पाटीदारने अप्रतिम कामगिरी केली असून मुंबईच्या गोलंदाजांचाही त्याच्यासमोर निभाव लागला नाही. पाटीदार फिरकीपटूंविरुद्ध सहजपणे फटकेबाजी करण्यासाठी ओळखला जातो. मात्र, त्याच्यासमोर लेग-स्पिनर मयांक मार्कंडेला गोलंदाजी देण्याची जोखीम मुंबईने पत्करली. पाटीदारने त्याच्या गोलंदाजीवर सलग तीन षटकार मारत मुंबईला अधिकच अडचणीत टाकले. त्याने सुरुवातीपासून चौफेर फटकेबाजी करताना आपल्या पहिल्या ११ चेंडूंत पाच षटकार आणि तीन चौकारांची आतषबाजी केली. त्याने अवघ्या १७ चेंडूंत अर्धशतक झळकावले. अखेर त्याची हीच खेळी दोन संघांतील फरक ठरली.

त्याआधी, बंगळूरुची सुरुवातही दमदार झाली. विराट कोहलीने (३८ चेंडूंत ५०) एक बाजू लावून धरण्याचा प्रयत्न केला, तर दुसऱ्या बाजूने फिल सॉल्टने (३६ चेंडूंत ७८) आक्रमक शैलीत खेळताना मुंबईच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. विशेषतः सॉल्टने मुंबईच्या फिरकीपटूंना लक्ष्य केले. त्याने डावखुरा फिरकीपटू मिचेल सँटनरच्या पहिल्या षटकात सलग तीन षटकार आणि एक चौकार, तर लेग-स्पिनर मयांक मार्कंडेच्या गोलंदाजीवर सलग तीन चौकार आणि एक षटकार मारला. अखेर शार्दूल ठाकूरने सॉल्टला बाद करत ही जोडी फोडली. त्यानंतर पाटीदार आणि टीम डेव्हिडने (१६ चेंडूंत नाबाद ३४) मोठे फटके मारताना बंगळूरुला २४० धावांचा टप्पा गाठून दिला.

विश्वातील सर्वोत्तम गोलंदाज अशी ख्याती असलेल्या जसप्रीत बुमराला 'आयपीएल'मध्ये संघर्ष करावा लागत आहे. या स्पर्धेतील सलग पाचव्या सामन्यात त्याची बळींची पाटी कोरी राहिली. गेल्या हंगामातील अखेरचा सामना (क्वालिफायर-२ विरुद्ध पंजाब), तसेच यंदाच्या हंगामातील सलग चार सामन्यांत बुमराला बळी मिळवता आलेला नाही.

आशा भोसले यांना आदरांजली

ख्यातनाम पार्श्वगायिका आशा भोसले यांचे रविवारी निधन झाले. त्यांना 'आयपीएल'मधील मुंबई-बंगळूरु सामन्यापूर्वी आदरांजली वाहण्यात आली. दोन्ही संघातील खेळाडू, तसेच प्रेक्षक मिनिटभर शांत उभे राहिले. खेळाडूंनी काळी दंडपट्टीही बांधली होती. तसेच ठरावीक षटकांनंतर आशा भोसलेंची लोकप्रिय गाणीही लावण्यात आली.

'रो-को' जायबंदी

या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा हे तारांकित जायबंदी झाले. बंगळूरुसाठी कोहलीने फलंदाजी केली, पण घोट्याच्या दुखापतीमुळे तो क्षेत्ररक्षणासाठी आला नाही. मुंबईच्या डावात रोहित शर्मा ९३ चेंडूंत १९ धावा करून पायाच्या दुखापतीमुळे (हॅमस्ट्रिंग) माघारी परतला.

एक षटक १७ मिनिटांचे...

मुंबईच्या डावातील १६वे षटक तब्बल १७ मिनिटे चालले. बंगळूरुसाठी या षटकाची सुरुवात रसिक दारने केली, तर शेवटचा चेंडू रोमारियो शेफर्डने टाकला. रसिकच्या पायाला दुखापत झाली. त्यामुळे त्याने प्रत्येकच चेंडूपूर्वी वैद्यकीय उपचार घेतले. पाचव्या चेंडूनंतर तो फिजिओंसह पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर शेवटचा चेंडू टाकण्याची जबाबदारी घेणाऱ्या रोमारियो शेफर्डने 'नो-बॉल' टाकला. त्यामुळे षटक अधिकच लांबले. या षटकात एकूण १० धावा निघाल्या आणि नमन धीर बाद झाला.

आजचा सामना

राजस्थान रॉयल्स वि. सनरायजर्स हैदराबाद

● वेळ : सायं. ७.३० वा.

थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, हॉटस्टार ॲप

राजस्थानच्या व्यवस्थापकाकडून 'आयपीएल' नियमांचे उल्लंघन

नवी दिल्ली : राजस्थान रॉयल्सचे संघ व्यवस्थापक रोमी भिंदर डगआउटमध्ये फोनचा वापर केल्याने वादात सापडले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुविरुद्धच्या 'आयपीएल' सामन्यादरम्यान मोबाइल (भ्रमणध्वनी) वापरला असल्याचे टीव्हीवरील छायाचित्रातून दिसून आले आहे.

ही घटना सुरुवातीला एका समाजमाध्यमावरून समोर आली. यामध्ये भिंदर हे तरुण खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या शेजारी बसून मोबाइल फोन वापरत असल्याचे दिसत होते. यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) एका अधिकाऱ्याने भिंदर यांनी खेळाडू आणि सामना अधिकारी क्षेत्राच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे मान्य केले आहे. 'आयपीएल'च्या नियमानुसार व्यवस्थापक ड्रेसिंग रूममध्ये फोन वापरू शकतात, परंतु डगआउटमध्ये त्यांना असा वापर करता येत नाही.

गिल, बटलरची चमक

गुजरातचा लखनऊवर सात गडी राखून विजय; प्रसिधचेही योगदान

पीटीआय, लखनऊ

वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाच्या (२८ धावांत ४ बळी) भेदक माऱ्यानंतर जोस बटलर (३७ चेंडूंत ६० धावा) व कर्णधार शुभमन गिल (४० चेंडूंत ५६ धावा) यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर गुजरात टायटन्स संघाने रविवारी झालेल्या पहिल्या 'आयपीएल' सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सवर सात गडी व आठ चेंडू राखून विजय मिळवला.

लखनऊला ८ बाद १६४ धावांवर रोखल्यानंतर गुजरातने १८.४ षटकांत ३ बाद १६५ धावा करीत चार सामन्यांतील आपला दुसरा विजय नोंदवला. गिलने आपल्या खेळीत सहा चौकार व एक षटकार लगावला. त्याने पहिल्या गड्यासाठी साई सुदर्शनसह (१५) ४५ आणि दुसऱ्या गड्यासाठी जोस बटलर याच्यासह ५८ चेंडूंत ८४ धावांची भागीदारी केली. बटलरने आपल्या खेळीत ११ चौकार लगावले. लखनऊने दिलेल्या १६५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या

गुजरातने सावधपणे खेळ केला. त्यांनी चार षटकांत २५ धावा केल्या. मग, गिलने पाचव्या षटकांत शमीविरुद्ध षटकार व तीन चौकार लगावत २० धावा केल्या. दिग्वेश राठीने सुदर्शनला बाद करीत गुजरातला पहिला धक्का दिला. मात्र, राठीच्या पुढील षटकात पंतने बटलरचा झेल सोडत जीवदान दिले. गिलने १२व्या षटकांत आवेश खानविरुद्ध एक धावा काढत ३४ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. बटलरने लिंडेच्या गोलंदाजीवर धावा काढत २९ चेंडूंत अर्धशतक साजरे केले. प्रिन्सने गिलला व शमी बटलरला माघारी धाडले. यानंतर वॉशिंग्टन सुंदर (नाबाद २१) व राहुल तेवतिया (नाबाद १०) यांनी संघाला लक्ष्यापर्यंत नेले.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या लखनऊची सुरुवात चांगली झाली नाही. मिचेल मार्श (११) बाद झाल्यावर ऋषभ पंत (१८), एडीन मार्करम (३) व आयुष बदोनी (९) बाद झाल्याने संघाची अवस्था ४ बाद ७४ अशी बिकट झाली होती. अखेरीस निकोलस पूरन (१९), अब्दुल समद (१८), मुकुल चौधरी (१८) यांच्या योगदानामुळे लखनऊला १६० धावांचा टप्पा गाठता आला. प्रसिधला सामन्यात, अशोक शर्मा (२/३२) व मोहम्मद सिराज (१/१९) यांनी चांगली साथ दिली. कगिसो रबाडाने एक गडी बाद केला असला, तरीही त्याने तब्बल ५४ धावा दिल्या. लखनऊ संघाला आपले आव्हान कायम राखायचे झाल्यास आगामी सामन्यांमध्ये कामगिरी उंचवावी लागेल.

आयुष शेट्टी उपविजेता

अंतिम फेरीत चीनच्या शी यू क्यूकडून पराभव

पीटीआय, निंगबो (चीन)

भारताच्या आयुष शेट्टीची आशियाई अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेतील स्वप्नवत घोडदौड अखेर उपविजेतेपदावर संपुष्टात आली. स्पर्धेत रविवारी झालेल्या अंतिम फेरीत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनच्या शी यू क्यू याने आयुषला सरळ दोन गेममध्ये पराभूत केले.

आपल्यापेक्षा वरचढ मानांकन असलेल्या खेळाडूंना हरवून आगेकूच करणाऱ्या आयुषला अंतिम सामन्यात लय गवसली नाही. विद्यमान जागतिक विजेत्या चीनच्या क्यू याने आयुषचा २१-८, २१-१० असा पराभव केला. या पराभवामुळे स्पर्धेत पुरुष एकेरीत सुवर्णपदक जिंकण्याची भारताची ६१ वर्षांची प्रतीक्षा कायम राहिली आहे.

अंतिम फेरीच्या लढतीत वेगवान हालचाली आणि अचूक स्मॅशेसच्या जोरावर क्यू याने आयुषला स्थिरावण्याची संधीच दिली नाही. क्यू याने सामन्याला ४-० अशी सुरुवात केली. क्यूचा खेळ इतका वेगवान होता की अनेकदा त्याने सलग गुणांचा सपाटा लावत आपली आघाडी भक्कम केली.

७-३, १०-५, १३-७, १६-८ अशी आघाडी वाढवत त्या क्षणी सलग पाच गुण घेत पहिला गेम सहज जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये आयुषने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु शी यू क्यूच्या अनुभवापुढे त्याचे प्रयत्न अपुरे पडले. कोर्टवर नियंत्रण राखत चिनी खेळाडूने सलग गुण मिळवले. आयुषने काही चांगले फटके खेळले खरे, पण प्रतिस्पर्ध्याच्या आक्रमक खेळासमोर तो टिकू शकला नाही. आयुषने २-७ अशा पिछाडीवर असताना पाच गुण घेत ७-७ अशी बरोबरी साधली. पण, हीच काय ती झुंज आयुषला देता आली. क्यू याने ७-८ अशा गुणस्थितीत सलग सात गुण घेत १४-८ अशी मोठी आघाडी घेतली आणि नंतर मागे वळून बघितलेच नाही. आयुषला नंतर केवळ दोनच गुण घेता आले.

वैशाली, दिव्या पराभूत

प्रज्ञानंदची एसिपेन्कोविरुद्ध बरोबरी

पाफोस (सायप्रस) : भारताची ग्रँडमास्टर आर. वैशाली व विश्वचषक विजेती दिव्या देशमुख यांच्या पदरी रविवारी निराशा पडली. 'कँडिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेच्या महिला विभागातील १२व्या फेरीत दोघींनाही पराभूत व्हावे लागले. तर, खुल्या गटात वैशालीचा भाऊ आर. प्रज्ञानंदने आंद्रे एसिपेन्कोविरुद्ध बरोबरीची नोंद केली.

महिलांमध्ये भारताच्या आर.वैशालीच्या कामगिरीकडे सर्वांचे नजरा होत्या. पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या वैशालीला चीनच्या झू जिनेरविरुद्ध संधीही होती. मात्र, वैशालीला केलेल्या चुका या लढतीत महागात पडल्या. जिनेरने संयमाने खेळताना संधीचा फायदा घेत वैशालीला ३९व्या चालीत नमविले. यामुळे वैशाली व जिनेर सात गुणांसह संयुक्तपणे आघाडीवर आहेत. सोमवारी विश्रांतीचा दिवस असून त्यानंतर केवळ दोन फेऱ्या शिल्लक आहेत. वैशालीला आपले आव्हान राखायचे झाल्यास उर्वरित फेऱ्यांमध्ये आपला खेळ उंचवावा लागेल.

याच गटातील लढतीत टॅन झोंगयीने दिव्याला ६२व्या चालीत पराभूत

करण्याची कामगिरी केली. विशेष म्हणजे दिव्यालाही पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना विजय मिळविण्यात अपयश आले. झोंगयी व दिव्या या दोघींचेही समान पाच गुण आहेत. अन्य लढतीत बिबिसारा असाउबायेवाने कॅटरिना लायनोला पराभूत केले. तर, ॲना मुझिचुक व ॲलेक्सांद्रा गोर्याचकिना यांनी बरोबरी नोंदवली.

खुल्या गटात प्रज्ञानंदने आंद्रे एसिपेन्कोशी बरोबरी नोंदवली. काळ्या मोहऱ्यांसह खेळतानाही प्रज्ञानंदने एसिपेन्कोसमोर आव्हान उपस्थित केले होते. मात्र, एसिपेन्कोने संयमाने खेळ करीत लढत ४६व्या चालीनंतर बरोबरीत सोडविण्यात यश मिळवले. मथियस ब्लूबाउम व फॅबियानो कारुआना तसेच, जावोखिर सिंदारोव आणि हिकारु नाकामुरा यांच्यातील लढती बरोबरीत राहिल्या. सिंदारोव नऊ गुणांसह आघाडीवर आहे.

HINDUJA HOUSING FINANCE

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

मुख्य कार्यालय : 167-169, कुतुब मजला अन्ना सलाई, लिट्टल माउंट, सैदापेट, चेन्नई-600015 ई-मेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

शाखेचा पत्ता : पहिला मजला, बुटी बिल्डिंग, ऑफिस ब्लॉक क्र. 101, एम. जी. हाऊस जवळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर - 440001आणि पहिला मजला, श्रीजी कॉम्प्लेक्स, चर्च रोड, एस.बी.आय. स्क्वेअर जवळ, यवतमाळ, जि. यवतमाळ - 445001 आणि यमुना तरंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, किर्ती नगर, मुर्तिजापूर रोड, अकोला - 444001 आणि पहिला मजला, अंबिका नगर, घाटपुरी नाका, साई बाबा मंदिर जवळ, खामगाव - 444303

अनु 13(2) अंतर्गत मागणी सूचना

आपण, म्हणजे खाली नमूद कर्जदारांनी खाली नमूद मालमत्ता तारण ठेवून कर्ज घेतलेले आहे आणि आपण, म्हणजे खाली नमूद व्यक्ती सदर कर्ज करारासाठी कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार आहात. आपण परतफेडीत कसूर केल्याने आपले खाते सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 (थोडक्यात सर्फेसी अधिनियम) अंतर्गत अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आले आहे. आम्ही, म्हणजे हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ने आपण दिलेल्या पत्त्यावर सरफेसीअधिनियमातील अनुच्छेद 13 (3) सह वाचण्यात येणारया अनु. 13 (2) अंतर्गत मागणी सूचना पाठविली. नोंदणीकृत टपाल / ब्लू डार्ट कुरियरद्वारे आपल्याला पाठवलेल्या सूचना बजावण्यात आणि त्या तशाच परत आल्या. सदर सूचनेत असे नमूद करण्यात आले आहे की आपण ज्या कर्जाच्या परतफेडीची हमी दिलेली होती त्याच्या परतफेडीत कसूर केलेली आहे. त्यामुळे, सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13 (2) मधील तरतुदी आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3(1) च्या तरतुदींच्या अनुषंगाने ही सूचना प्रकाशित करण्यात येत आहे.

कर्जदार व जामीनदाराचे नाव / खाते क्र.	मागणी सूचनेनुसार थकबाकी रक्कम	मागणी / एनपीए दिनांक
1. श्री. प्रदिप सावनिया बोवडे (मृत) (कर्जदार) आणि 2. श्रीमती प्रतिभा प्रदिप बोवडे (मृत श्री. प्रदिप सावनिया बोवडे यांचे कायदेशीर वारस), (सह-कर्जदार), श्री. हर्ष प्रदीप बोवडे (मृत श्री. प्रदीप सावनिया बोवडे यांचे कायदेशीर वारस) श्री. शिवम प्रदीप बोवडे (मृतक श्री. प्रदीप सावनिया बोवाडे यांचे कायदेशीर वारस) MH/NGR/NPUR/A000001117	08/03/2026 रोजी रु. 748495.00/-	26/03/2026 06-10-2025
जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा त्यासोबत बांधकाम प्लॉट नं. 81, एकुण क्षेत्रफळ एरिया (1230 चौ.फु)(114.269 चौ.मी) लेआउट सारीपुत्रा को-ऑप हाउसिंग सोसायटी लि. नागपूर, खसरा नं. 89/1(जुना), नविन गट नं. 108,109, मौजा वाडी, पी एच नं. 5, वार्ड नं. 18, मालमत्ता नं. 1583 नगरपरिषद वाडी ता. नागपूर(रुरल) आणि जि. नागपूर याच्या हद्दीत आणि अधिकारक्षेत्रात असलेली मालमत्ता आणि त्यावरील चतुर्सिमा - उत्तर - 20 फु रोड, दक्षिण - प्लॉट नं. 80, पुर्व - 30 फु रोड, पश्चिम - इतर लेआउट जमिन		
1. श्री. मिर्झा काशिफ बैग (कर्जदार) आणि 2. श्री. मिर्झा असफिउल्लाह बैग मिर्झा शारीफुल्लाह बैग (सह-कर्जदार), आणि 3. श्रीमती राहत सुलताना मिर्झा असिफ बैग (सह-कर्जदार) MH/AKL/KMGN/A000000237	08/3/2026 रोजी रु. 1014871.00/-	26/03/2026 05.03.2026
जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग पश्चिमेकडील प्लॉट नं. 244, एकुण क्षेत्रफळ(827.01चौ.फु), एकुण क्षेत्रफळ(76.86 चौ.मी.) नझुल प्लॉट नं. 244/243, नझुल शीट नं.8-सी, जळगाव जामोद ता. जळगाव-जामोद, आणि जि. बुलढाणा नगरपरिषद हद्दित, जळगाव-जामोद आणि त्यावरील चतुर्सिमा - उत्तर - लियाखत अली खान, जिलानी खान यांची मालमत्ता /खुली जागा, दक्षिण - रोड, पुर्व - आरीफ बैग मिर्झा शरीफ बैग / खुली जागा, पश्चिम - सरकारी गल्ली / रोड		
1. श्री. विजय गुंजाळ (कर्जदार) आणि 2. श्री. सुरेश गुंजाळ (सह-कर्जदार) आणि 3. श्रीमती गीताबाई गुंजाळ (सह-कर्जदार) MH/AKL/KMGN/A000000026	08/3/2026 रोजी रु. 617158.00/-	26/03/2026 05.03.2026
जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग दक्षिणेकडील प्लॉट नं. 5, एकुण क्षेत्रफळ(153.00चौ.मी),(1646.00 चौ.फु.) सर्व गट नं. 2, मौजे गडेगाव, ता. मालकापुर आणि जि. बुलढाणा हद्दित असुन गडेगाव पंचायत, आणि त्यावरील चतुर्सिमा - उत्तर - प्लॉट नं. 4, दक्षिण -प्लॉट नं. 6, पुर्व - रोड, पश्चिम - प्लॉट नं. 7		
1. श्री. यश श्रीकृष्णा चव्हाण (कर्जदार) आणि 2. श्रीमती लता श्रीकृष्णा चव्हाण, (सह-कर्जदार) MH/AKL/KMGN/A000000373	08/3/2026 रोजी रु. 525359-00/-	26/03/2026 05.03.2026
मालमत्ता नं. 1) जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा ग्रामपंचायत मालमत्ता नं. 226, एकुण क्षेत्रफळ (300 चौ.फु) मौजे कोर्हाला बाजार, ता. मोटाला, जि. बुलढाणा उपनिबंधक मोटाळा आणि ग्रामपंचायत कोर्हाला बाजारच्या हद्दित आणि त्यावरील चतुर्सिमा: मालमत्ता नं. 2) सर्व भाग आणि तुकडा ग्रामपंचायत मालमत्ता नं. 227, एकुण क्षेत्रफळ(270चौ.फु) मौजे कोर्हाला बाजार, ता. मोटाळा, जि. बुलढाणा उपनिबंधक मोटाळा आणि ग्रामपंचायत कोर्हाला बाजारच्या हद्दित आणि त्यावरील चतुर्सिमा: - उत्तर -मालमत्ता नं.1 श्रीकृष्ण चव्हाण आणि मालमत्ता नं. 2 शाताराम चव्हाण, दक्षिण --मालमत्ता नं.1 सुभाष सोनोने आणि मालमत्ता नं. 2 गजानन चव्हाण, पुर्व - मालमत्ता नं.1 रोड आणि मालमत्ता नं. 2 रोड, पश्चिम - -मालमत्ता नं.1 स्वपना रत्नपारखी आणि मालमत्ता नं. 2 राजकांत सपकाळ		
1. श्री. संतोष कदम (कर्जदार) आणि 2. श्री. अंकुश कदम (सह-कर्जदार) आणि 3. श्रीमती सुवर्णमाला कदम (सह-कर्जदार) MH/YAV/YAVA/A000000200	08/3/2026 रोजी रु. 537520.00/-	26/03/2026 05.03.2026
जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग लेआउट प्लॉट नं. 66(भाग), एकुण एरिया क्षेत्रफळ (60.22चौ.मी),(648 चौ.फु) आणि बांधलेले घर 18.00 चौ.मी. फिल्ड सर्वे नं./ गट नं. 321/1, मौजे उमरखेड खांड-2, ता. उमरखेड, जि. यवतमाळ, उपनिबंधक उमरखेड आणि उमरखेड नगरपरिषद, त्यावरील चतुर्सिमा: - उत्तर -उर्वरित भाग प्लॉट नं. 66श्री बयैनाबाई लक्ष्मणराव घोडे यांच्या नावे, दक्षिण --काकडे यांचे घर, पुर्व - दिपक कांबळे यांचे घर, पश्चिम - 6 मी रोड		
1. श्री. गोविंद घानोकर (कर्जदार) आणि 2. श्रीमती अरुणा घानोकर (सह-कर्जदार) MH/AKL/KMGN/A000000107	08/3/2026 रोजी रु. 871244.00/-	26/03/2026 05.11.2025
जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग घराचा मालमत्ता नं.400, एकुण क्षेत्रफळ(2031 चौ.फु)(188.75चौ.मी), वार्ड नं. 2, बेलुरा गाव, ता. नांदुरा आणि जि. बुलढाणा, ग्रामपंचायत च्या हद्दीत, बेलुरा आणि चतुर्सिमा: - उत्तर -18 फु रोड, दक्षिण -भाऊराव घानोकर यांची मालमत्ता, पुर्व - गोपाल दत्तुजी यांची मालमत्ता, पश्चिम -गजानन भोकारे यांची मालमत्ता		
1. श्री. रामेश्वर इंगळे (कर्जदार) आणि 2. कुमारी. सुष्मा इंगळे, (सह-कर्जदार) MH/AMR/AKLA/A000000101	08/3/2026 रोजी रु. 607099.00/-	26/03/2026 05.01.2026
जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग जमिनीचा मालमत्ता नं.651, घर नं. 667, एकुण क्षेत्रफळ (1500 चौ.फु) बांधलेला क्षेत्रफळ एरिया 900 चौ.फु मौजे चांनी, ता. पातुर, जि. अकोला, उपनिबंधक अकोला आणि ग्रामपंचायत चांनी च्या हद्दीत, ता. पातुर, जि. अकोला आणि चतुर्सिमा: - उत्तर -ज्ञानदेव घोरे यांचे घर, दक्षिण -खुली जागा, पुर्व - सरकारी रस्ता, पश्चिम -रमेश इंगळे यांचे घर / जमीन		

1)रितेश गवई (RLM)-9011858221 2)रुपिकेश उभाळे (ALM)-9823244498 3)राहुल निकुरे (CLM)-9405473208 ४)मिथलेश देहरिया(CRM)- 8226009399

स्थळ : नागपूर, यवतमाळ, अकोला, खामगाव
दिनांक : 13.04.2026

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,
प्राधिकृत अधिकारी

पंजाब नॅशनल बँक punjab national bank ...the name you can BANK upon !

आस्ति वसूली प्रबंधन शाखा पीएनबी हाउस, किंगस्वे, नागपूर - 440001
ईमेल : cs6795@pnb.bank.in

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतूदींसह वाचण्यात येणा-या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. याद्वारे कर्जदार व जामीनदार तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा बँक/सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिका-यांनी रचनात्मक/प्रत्यक्ष/सांकेतिक ताबा घेतलेला असून संबंधित कर्जदार व जामीनदारांकडून बँक/सुरक्षित धनकोस घेणक असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या दिनांकास त्यांची ''जशी आहे जेथे आहे, जशी आहे जे काही आहे आणि ''जे काही आहे तेथेच आहे'' तत्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम खाली त्या-त्या मालमत्तांच्या समोर नमूद करण्यात आलेली आहे.

सुरक्षित मालमत्तेचे वेळापत्रक

अ. क्र.	शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार(वैयक्तिक/संयुक्त/फर्म/कं.) चे नाव प्रोप्रायटर/भागीदार/संचालक/जमानतदार	अचल संपत्तीचा तपशील तारण/मालकाचे नाव (मालमत्ता तारण)	अ) सेक्शन 13(2) सरफेसी ॲक्ट 2002 अन्वये मागणी सूचना तारीख ब) थकीत बाकी रक्कम क) सेक्शन 13(4) सरफेसी ॲक्ट 2002 अन्वये ताबा तारीख ड) ताब्याचा प्रकार सांकेतिक/प्रत्यक्ष/रचनात्मक	अ) राखिव किंमत (रुपये) ब) ईएमडी रक्कम क) (ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख) ड) बोली वाढ करण्याची रक्कम	ई-लिलाव तारीख/वेळ	सुरक्षित लेनदारांना ज्ञात बोजांचा तपशील
1.	धरमपेठ नागपूर मेसर्स. एस पी एग्रो ट्रेड अँड फुड प्रा लि. (कर्जदार) श्री. प्रदीप कुमार छगणलाल दुगार (डायरेक्टर/गहाणदार) आणि श्रीमती. रीता प्रदीप दुगार (डायरेक्टर / गहाणदार)	ईएम चा संपुर्ण सुपरस्ट्रक्चर खुला प्लॉट नं. 145, ब्लॉक-डि, खा. नं. 19/1, 32/1,33/1 लेआउट चंद्रभागा गृह निर्माण सहकारी संस्था लि. नागपूर पीएच नं. 34, वार्ड नं. 21, शिट नं. 777/7, सिटी सर्वे नं. 31, महानगर हाऊस नं. 603/डि/145, मौजा- पारडी एनएमसी आणि एनआयटी नागपूर च्या हद्दीत ता आणि जि. नागपूर **श्री. प्रदीप कुमार दुगार आणि श्रीमती. रीता प्रदीप दुगार यांच्या मालकीचे** चतुर्सिमा:- पुर्व: प्लॉट नं. 146, पश्चिम: प्लॉट नं. 144, उत्तर: इतर खासरा ची जागा, दक्षिण: 25 फुट रुंद रोड	अ) 29/07/2019 ब) 23/07/2019 रोजी रु. 1,81,19,389.08 अधिक व्याज आणि अन्य शुल्क डब्लु.इ.एफ 01/07/2019 क) 01/11/2019 ड) सांकेतिक ताबा	अ) रु. 54,85,000/- ब) रु. 5,48,500/- क) 04.05.2026 ड) 10000.00	05.05.2026 रोजी स. 11 ते दु. 4.00 वाजे पर्यंत	ज्ञात नाही
2.	शाखा: लकडगंज, नागपूर मेसर्स अग्रवाल सन्स (कर्जदार) श्री. दिपेश बालकिशनदास अग्रवाल, (प्रोप्रायटर/गहाणदार) श्रीमती जया दिपेश अग्रवाल (जमानतदार/गहाणदार)	0.97% अविभाजीत हिस्सा आणि व्यापासह जमिनीचे सर्व भाग व तुकडा प्लॉट नं. आर-1, क्षेत्रफळ 3586.80 चौ.मी. संपूर्ण जमिनीचा एक भाग, ख. नं. 29 आणि 30, मौजा लावा, पी.एच. नं. 4, आरसी सुपरस्ट्रक्चरसह समावष्टि अपार्टमेंट नं. 209, कवरिंग सुपर बिल्ट अप एरिया 80.90 चौ.मी. ''ओम सृष्टी विंग बी'' ही इमारत दुस-या मजल्यावर स्थित आहे, हाउस नं. 889, लावा रोड, ग्रामपंचायत लावा च्या हद्दित, वार्ड नं. 3 ता. नागपूर (ग्रामिण) आणि जि. नागपूर आणि चतुर्सिमा: पुर्व: 9 मी लेआउट रस्ता, पश्चिम: खासरा चतुर्सिमा, उत्तर: एमिनीटी आणि खुली जागा, दक्षिण: 9 मी रुंद लेआउट रस्ता. **(मालक : श्रीमती जया दिपेश अग्रवाल आणि श्री. दिपेश बालकिशनदास अग्रवाल)**	अ) 22.09.2022 ब) रु. 34,15,757.00 + पुढिल व्याज आणि अन्य शुल्क डब्लु.ई.एफ 01.09.2022 क) 20.09.2024 ड) प्रत्यक्ष ताबा	अ) रु. 15,30,000/- ब) रु. 1,53,000/- क) 04.05.2026 ड) 10000.00	05.05.2026 रोजी स. 11.00 ते दु. 4.00 वाजे पर्यंत	ज्ञात नाही
3.	हिंगणघाट मेसर्स किशन एग्रो इंडस्ट्रिज (कर्जदार) श्री. नितिन किशनचंद मोटवानी (प्रोप्रायटर/गहाणदार नं.1) श्रीमती. माया किशनचंद मोटवानी (जमानतदार/गहाणदार नं. 2) श्री. गिरिश देवांदास मोटवानी (जमानतदार/गहाणदार नं. 3) श्री. देवांदास रोहंदमल मोटवानी (जमानतदार)	संपत्तीचा सर्व भाग आणि तुकडा तसेच रहिवासी विभाजित प्लॉट नं. 17 क्षेत्रफळ 303.75 चौ.मी, प्लॉट नं. 18 क्षेत्रफळ 303.75 चौ.मी, प्लॉट नं. 21 क्षेत्रफळ 126.00 चौ.मी प्लॉट नं. 22 क्षेत्रफळ 126.00 चौ.मी., प्लॉट नं. 23 क्षेत्रफळ 126.00 चौ.मी आणि प्लॉट नं. 27 क्षेत्रफळ 50.00 चौ.मी विभाजित फिल्ड सर्वे नं. 226 विभाजित रहिवासी उद्देशा क्रमाने दिनांक 27/01/2014 केस नं. 85/एनएपी-34/2011-12 मौजा छिनोरा, मौजा नं. 193, पी.सी नं. 17, ता. वरोरा, जि. चंद्रपुर **श्री. गिरिश देवांदास मोटवानी आणि श्री. नितिन किशनचंद मोटवानी प्लॉट नं. 17 आणि 18 चतुर्सिमा:-** पुर्व: रोड, पश्चिम: प्लॉट नं. 21, 24, उत्तर: प्लॉट नं. 16, दक्षिण: प्लॉट नं. 19. **प्लॉट नं. 21 आणि 23 ची चतुर्सिमा:-** पुर्व: प्लॉ